## List of 144 Items Alongwith the Instructions Given to the Judges

फक्त संशोधनाखातर

नांव पुरुष / स्त्री

पत्ता

शिक्षण

व्यवसाय

सोबत म्हातारीं माणसं व त्यांची वागणूक यासंबंधीं कित्येक विधानं दिली आहेत. काही विधानं म्हाताऱ्या माणसांसंबंधीं निरनिराळ्या प्रमाणांत अनुकूलता दर्शवितात तर काही त्यांच्या संबंधीं तशाच प्रमाणांत प्रतिकूलता दर्शवितात. तसेंच इतर काहीं विधानं फक्त तटस्थपणाच तेवढा सूचित करतात. कृपा करून सर्व विधानं काळजीपूर्वक वाचा आणि त्यांची अनुकूलदर्शकता, प्रतिकूलदर्शकता व त्यांचं प्रमाण याच्या आधारानं सर्व विधानांचं खाली सांगितल्याप्रमाणें मूल्यमापन करा.

सगळ्या विधानांचं निरनिराळ्या ११ वर्गात (Piles) वर्गीकरण व्हायला पाहिजे. हे वर्ग म्हणजे पुढील अक्षरं होत – A, B, C, D, E, F, G, H, I, J आणि K. या ११ अक्षरांपैकीं A, B, C, D व E ही अक्षरें उतरत्या क्रमानें निरनिराळ्या प्रमाणांत प्रतिकूलता दर्शवितात. A हें अक्षर आत्यंतिक प्रतिकूलता दर्शवितं तर E हें अक्षर कमीत कमी प्रतिकूलता दर्शवितं. G, H, I. J आणि K हीं अक्षरें अनुकूलता दर्शवितात. यांतील G हें अक्षर कमींत कमी व K हें अक्षर अतिरिक्त अनुकूलता दर्शवितें F हें अक्षर तटस्थ मत व्यक्त करतं. अशा प्रकारें हीं ११ अक्षरं आत्यंतिक प्रतिकूलतेपासून आत्यंतिक अनुकलतेपर्यन्त पुढें दाखवल्याप्रमाणें जाणारी एक मोजपट्टी (Scale) तयार करतात.

A B C D E F G H I J K

Extremely unfavourable — Neutral — Extremely favourable

म्हाताऱ्या माणसांबद्दल तिरस्कार, राग, द्वेष, अनादर इत्यादि प्रतिकूले भाव जागृत करणाऱ्या सर्व विधानांचा A, B. C, D आणि E या वर्गात त्यांच्या प्रतिकूलदर्शकतेच्या उतरत्या क्रमानें समावेश करावा.

याच्या उलट म्हाताऱ्या माणसांबद्दल आदर, कौतुक, प्रेम, अभिमान, आभार इत्यादि अनुकूल भाव जागृत करणाऱ्या सर्व विधानांचा G, H, I, J व K या वर्गात त्यांच्या अनुकूलदर्शकतेच्या चढत्या क्रमानं समावेश करावा

जीं विधानं वर उल्लेखिलेले कोणतेच भाव जागृत करीत नाहीत तीं F या वर्गांत घालावीत.

उदाहरणार्थ असें समजा कीं, "म्हातारीं माणसं" या विषयाऐवजीं "चहा" या विषयावर तुम्हाला पुढील विधानं वरील प्रकारच्या वर्गीकरणाखातर दिलेलीं आहेत :—

(१) चहा ही मानवी जीवनांतील एक अत्यावश्यक बाब आहे.
(२) चहा हें एक प्रकारचं विष होय.
(३) चहा या पेयांत कोणतेही ठळक प्रकारचे गुण किंवा दोष नाहींत.
(४) चहामुळं माणसाला ताजंतवानं वाटतं.
(५) चहामध्यें पोषक द्रव्यांचा प्रकर्षानें अभाव आहे.

या ठिकाणीं बहुधा तुम्ही पुढील प्रकारें वर्गीकरण कराल.

वाक्य नं. १)— K वर्गात
वाक्य नं. २)— A वर्गात
वाक्य नं. ३)— F वर्गात
वाक्य नं. ४)—G, H, I यांपैकी कोणत्याही एका वर्गात
वाक्य नं. ५)—C, D, E यांपैकीं कोणत्याही एका वर्गात

या वर्गीकरणांत तुमच्या स्वतःच्या चहाविषयींच्या आवडीचा किंवा नावडीचा प्रश्नच उद्भवत नाहीं कारण वर्गीकरण करायचं तें "चहा" हा विषय व वरील विधानं यांच्या परस्परसंबंधाचं. याप्रमाणं तुम्हाला फक्त एखादं विधान (उदा० वर दिलेली चहाविषयींचीं वाक्यं) व त्या विधानाचा विषय (उदा० चहा) यांच्या मधील संबंधाचंच केवळ मूल्यमापन करायचं आहे.

संशोधनांतील यशाचा बराचसा भाग तुमच्या काळजीपूर्वक केलेल्या वर्गीकरणावर अवलंबून असल्यानें कृपा करून तुमचं वर्गीकरण शक्य तितक्या चिकित्सक दृष्टीनं करा आणि एखादें विधान ज्या वर्गांत मोडतें त्या वर्गाचं अक्षर त्या विधानापुढं दाखविलेल्या कंसांत लिहा. उदा०—

१ चहा ही मानवी जीवनांतील एक अत्यावश्यक बाब आहे. [K]

२ चहा हें एक प्रकारचं विष आहे. [A]

१

| | | |
|---|---|---|
| १ | म्हातारीं माणसं दिसायला इतकी ओंगळ दिसतात कीं त्यांच्याकडे मुळीं बघवतच नाही. | [ ] |
| २ | म्हाताऱ्या माणसांशी चर्चा करण्याच्या भानगडीत शहाण्यानें पडूं नये; त्यांची समजूत घालणं ब्रह्मदेवालाही जमणार नाही. | [ ] |
| ३ | आपल्या मनाविरुद्ध जरा कांहीं झालं तरी म्हातारी माणसं आरडाओरड करून सारं घर डोक्यावर घेतात. | [ ] |
| ४ | म्हाताऱ्या माणसांना तरुणांच्या पैशावर जगायला संकोच वाटतो. | [ ] |
| ५ | म्हातारीं माणसं प्रकृतीनं चारचौघांसारखीं असल्यानं त्यांना इतर माणसांसारखंच जीवन जगतां येतं. | [ ] |
| ६ | म्हाताऱ्या माणसांना कुटुंबांत सर्वांनीं मान दिला पाहिजे. | [ ] |
| ७ | म्हातारीं माणसं खुळचट धार्मिक भावनांच्या आहारीं गेलेलीं असतात. | [ ] |
| ८ | म्हाताऱ्या माणसांचीं नैतिक मूल्यं उच्च प्रतीची असतात; तीं कधींच कुणाला फसवणार नाहींत. | [ ] |
| ९ | म्हातारीं माणसं दिसायला रुबाबदार व वजनदार दिसतात. | [ ] |
| १० | म्हाताऱ्या माणसांच्या म्हणण्याकडे फारसं लक्ष देऊं नये; त्यांचा उपदेश एका कानानं ऐकून दुसऱ्या कानान सोडून देण्याच्या योग्यतेचा असतो. | [ ] |
| ११ | म्हातारी माणसं शात व समतोल स्वभावाचीं असतात. | [ ] |
| १२ | म्हाताऱ्या माणसांनां स्वत: काम करण्याचा कंटाळा असल्यानें तीं आपल्या खर्चाचा बोजा तरुण पिढीवर लादतात. | [ ] |
| १३ | म्हातारी माणसं आपल्या दुखण्याबाण्यांच्या विचारांतच गढलेलीं असतात. | [ ] |
| १४ | म्हाताऱ्या माणसांची राहण्याची व्यवस्था त्यांच्या मुलाबाळांच्या कुटुंबांत चांगल्या प्रकारें व्हायला हवी. | [ ] |
| १५ | म्हातारी माणसं नास्तिक असतात. | [ ] |
| १६ | दिलेला शब्द पाळायला काय वाटेल तें दिव्य करायला म्हातारी माणसं तयार असतात. | [ ] |
| १७ | म्हातारी माणसं चळल्यासारखीं वागतात. | [ ] |
| १८ | म्हाताऱ्या माणसांना समाजात योग्य तो मान मिळायलाच पाहिजे. | [ ] |
| १९ | म्हातारीं माणसं भारी स्वार्थी असतात. तरुणाकडून तीं भलत्याच मोठ्या अपेक्षा करतात. | [ ] |
| २० | कितीही वय झालं तरी दुसऱ्याच्या कमाईवर जगणं म्हाताऱ्या माणसांना रुचत नाहीं. तीं आपलीं कसलीही धडपड करून स्वावलंबनानें जगतात. | [ ] |
| २१ | म्हाताऱ्या माणसांना आपल्या दुखण्याचा वाऊ करण्याची वाईट संवय असते. | [ ] |
| २२ | म्हाताऱ्या माणसांपासून कुटुंबांतील लोकांना बराच उपद्रव होतो. | [ ] |
| २३ | म्हातारीं माणसं धर्मभोळी व देवभक्त असतात. | [ ] |
| २४ | म्हाताऱ्या माणसाना कधी कुणी विश्वासात घेऊं नये. त्यांना दुसऱ्याचं गुपित ठेवतां येत नाहीं. | [ ] |
| २५ | काहीं म्हातारीं माणसं कुरुप दिसतात तर कांही आकर्षक वाटतात हेंहीं तितकंच खरं. | [ ] |
| २६ | म्हातारी माणसं समाजाला भारभूत होऊन बसली आहेत. | [ ] |
| २७ | म्हाताऱ्या माणसांच्या लहरी क्षणाक्षणाला बदलतात; त्यांना काय हवं नको हेंच कळत नाही. | [ ] |
| २८ | म्हातारीं माणस इतकीं लोभी असतात कीं गांठचा पैसा तसाच ठेवून तरुण पिढीवर ती आपला खर्च लादतात. | [ ] |
| २९ | इतर माणसाच्या व म्हाताऱ्या माणसांच्या स्वतःच्या प्रकृतीकडे पहाण्याच्या दृष्टिकोनांत विशेष फरक नसतो. | [ ] |
| ३० | घरांतील बऱ्याच कटकटी व भांडणं घरांतल्या म्हाताऱ्या माणसांमुळं उद्भवतात. | [ ] |
| ३१ | म्हाताऱ्या माणसांचा सगळा वेळ ईश्वरचिंतनात व पूजेअर्चेत जात असल्यानें इतरांना त्यांचा मुळींच उपद्रव होत नाही. | [ ] |
| ३२ | म्हातारी माणसं बिनदिक्कतपणं एखाद्याचा विश्वासघात करतात. | [ ] |
| ३३ | म्हाताऱ्या माणसांचं व्यक्तित्व प्रभावशाली असतं. | [ ] |
| ३४ | जगांत म्हातारी माणसं नसतीं तर सुखाची वाण पडली नसती. | [ ] |
| ३५ | म्हातारीं माणसं तापट, चिडखोर व कटकट करणारीं असतात. | [ ] |
| ३६ | म्हातारीं माणसं खर्चाच्या बाबतींत इतर चारचौघांप्रमाणेंच असतात. | [ ] |
| ३७ | म्हाताऱ्या माणसांना स्वतःचं दुखणं कुरवाळीत बसायला फार आवडतं. | [ ] |

| | | |
|---|---|---|
| ३८ | कुटुंबांतल्या लोकांना म्हाताऱ्या माणसांची काळजी घेण हे एक कटकटीचं काम होऊन बसतं. | [ ] |
| ३९ | धार्मिक बाबतींत म्हातारीं माणसं तरुणांइतक्याच डोळसपणानें वागतात. | [ ] |
| ४० | म्हातारीं माणसं लाचखाऊ असतात. | [ ] |
| ४१ | म्हातारी माणसं स्वच्छ व नीटनेटकी असतात. | [ ] |
| ४२ | म्हातारीं माणसं समाजाला उत्तम मार्गदर्शन करूं शकतात. | [ ] |
| ४३ | म्हातारी माणसं संशयी व मत्सरी वृत्तीची असतात. | [ ] |
| ४४ | म्हातारीं माणसं घरांत असलीं तर घरखर्चाला आळा घालणं अशक्य होतं. | [ ] |
| ४५ | म्हातारी माणसं आपल्या आरोग्याची चागली काळजी घेतात. | [ ] |
| ४६ | घरांत म्हातारीं माणसं असलीं तर कुटुंबांतील तरुणांचं मनःस्वास्थ्य बिघडत. | [ ] |
| ४७ | म्हाताऱ्या माणसांचा सोंवळ्या ओंवळ्यांचा गोधळ इतका असतो की त्यामुळे घरातल्या माणसाची गैरसोय होते. | [ ] |
| ४८ | म्हातारीं माणसं लांचलुचपतीपासून अलिप्त राहतात. | [ ] |
| ४९ | तसं पाहिलं तर म्हाताऱ्या माणसांच्या व इतराच्या व्यक्तित्वात डोळ्यात भरण्या इतपत फरक आढळत नाही. | [ ] |
| ५० | म्हातारी माणस हें समाजाला मिळालेलं वरदान आहे. त्यांची सामाजिक योग्यता निर्विवाद आहे. | [ ] |
| ५१ | म्हाताऱ्या माणसांना दुसऱ्यांच्या अडचणीबद्दल सहानुभूति नसते. | [ ] |
| ५२ | तरुणांनी आपल्यासाठी ऐपतीबाहेर खर्च करावा अशी म्हाताऱ्यांची अपेक्षा असते. | [ ] |
| ५३ | म्हाताऱ्या माणसांच्या प्रकृतीबद्दलच्या इतक्या तक्रारी ऐकल्यावर वाटतं की म्हातारं होऊन जगण्यापेक्षां मरण बर. | [ ] |
| ५४ | घरांत म्हातारी माणसं असलीं कीं, कुटुंबांत खेळीमेळीचं वातावरण दिसून येतं. | [ ] |
| ५५ | म्हातारीं माणसं स्वतःच्या धार्मिक कल्पना तरुणांवर लादायला पाहतात. | [ ] |
| ५६ | म्हाताऱ्या माणसाना नीतिमत्तेची चाड नसते. | [ ] |
| ५७ | म्हातारी माणसं दिसायला जितकीं विचित्र तितकीच वागायलाही तऱ्हेवाईक. | [ ] |
| ५८ | म्हातारीं माणसं समाजाच्या प्रगतीला व उन्नतीला काडीचाहि हातभार लावीत नाहीत. | [ ] |
| ५९ | म्हातारी माणस आनंदी वृत्तीची असतात. | [ ] |
| ६० | म्हातारी माणस उधळीं असतात. तरुणांनी निढळाच्या घामाने मिळवलेला पैसा उडवून लावायला त्याना काहीच वाटत नाही. | [ ] |
| ६१ | म्हातारी माणस स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करतात ह्मणूनच त्यांचीं दुखणी बळावतात. | [ ] |
| ६२ | म्हातारी माणस घरांतल्या तरुणांच्या कित्येक जबाबदाऱ्या साभाळतात, त्यामुळें अशा कुटुंबांतील तरुणांच जीवन आनंदी असत. | [ ] |
| ६३ | म्हातारीं माणसं धार्मिक भावनेच्या आहारीं गेलेली असली तरी तरुणांना त्यापासून बाध येत नाही. | [ ] |
| ६४ | म्हाताऱ्या माणसाना इकडच तिकडे करून चहाड्या करण्याची वाईट खोड असते. | [ ] |
| ६५ | म्हातारीं माणस मोठी प्रेमळ व मिट्ठास असतात, | [ ] |
| ६६ | म्हाताऱ्या माणसांच बोलणं कंटाळवाणं असत. कांही केल्या त्याच चऱ्हाट थाबतच नाही. | [ ] |
| ६७ | म्हाताऱ्या माणसांना इतराना त्रास देणं मुळीच रुचत नाही. म्हणूनच बिचारीं आपलं दुःख आपणापाशीच ठेवतात. | [ ] |
| ६८ | तरुणाचा पैसा खर्चावा लागल्यास म्हातारीं माणसं हात राखून खर्च करतात. | [ ] |
| ६९ | म्हाताऱ्या माणसाची प्रकृती जरी तरुणांइतकी नसली तरी बरीचशी सुदृढ असते. | [ ] |
| ७० | म्हातारी माणसं घरांतल्या लोकाच्या सर्वच बाबतीत इतकी लुडबड करतात की, तरुणांना जीवन असह्य होतं | [ ] |
| ७१ | धार्मिकपणाच्या नांवाखाली म्हातारी माणसं आपला दांभिकपणा झाकायला पाहतात. | [ ] |
| ७२ | म्हातारी माणसं उसनवार घेतलेल्या गोष्टीच्या परतफेडीबद्दल फार जागरूक असतात. | [ ] |
| ७३ | म्हाताऱ्या माणसांची वेशभूषा व राहाणी गबाळी असते. | [ ] |
| ७४ | म्हाताऱ्या माणसांशी सुरळीत पटवून घेणं महाकठीण काम. | [ ] |

७५ म्हातारी माणसं कमालीची निःस्वार्थी असतात; तरुणांसाठीं वाटेल तो त्याग करण्याची त्यांची तयारी असते. [ ]

७६ म्हाताऱ्या माणसाबद्दल कितीही सहानुभूति असली तरी या महागाईच्या दिवसांत त्यांच्या खर्चाचा बोजा तरुणानी न उचललेला बरा. [ ]

७७ म्हाताऱ्या माणसांचा सगळा वेळ आपल्या शारीरिक पिरपिरीचं चऱ्हाट घोळवण्यांतच जातं. [ ]

७८ घरांतील म्हाताऱ्या माणसाची योग्य काळजी घेणं हें प्रत्येक तरुणाचें आद्य कर्तव्य आहे. [ ]

७९ दुसऱ्यांच्या जीवावर जगतात म्हणूनच म्हाताऱ्या माणसांना धर्माचं अवडंबर माजवतां येतं. [ ]

८० आजकालच्या तरुणाच्या नैतिक मूल्यांचा म्हातारी माणसं तिरस्कार करतात. [ ]

८१ म्हातारीं माणसं सौंदर्यप्रसाधनांचा योग्य प्रमाणांत उपयोग करतात. [ ]

८२ तरुण पिढीला म्हाताऱ्या माणसाची सहानुभूति व मदत हटकून मिळतेच. [ ]

८३ म्हातारी माणसं पराकाष्ठेची कंजूष असतात. [ ]

८४ म्हाताऱ्या माणसांच्या गरजा मोजक्याच असल्यानें त्यांच्यासाठी फारसा खर्च होत नाहीं. [ ]

८५ म्हातारीं माणस खादाडपणामुळें प्रकृति बिघडवून बसतात. [ ]

८६ घरांत म्हातारी माणसं असणं हें घरांतील तरुणांना वरदानासारखं होय. [ ]

८७ म्हातारी माणसं देवधर्मात इतका वेळ घालवतात कीं कसल्याही कामकाजाला हातभार लावायला त्यांना वेळ मिळत नाही. [ ]

८८ म्हाताऱ्या माणसांना आपल्या नीतिमत्तेचा भलताच तोरा असतो. [ ]

८९ म्हाताऱ्या माणसांच्या संवयी इतक्या चिवट झालेल्या असतात कीं त्यांना परिस्थितींशी मिळतं घेणं कदापि जमत नाही. [ ]

९० म्हातारी माणसं व तरुण पिढी यांत तसा म्हणण्यासारखा फरक नसल्यानं कुणीही सहजपणें त्याच्यांत मिसळू शकेल. [ ]

९१ म्हातारी माणसं इतकी विवेकी असतात की तरुण पिढीने त्यांच्यापासून जरूर धडा घ्यावा. [ ]

९२ आपली अख्ख्या हयातीतील कमाई म्हातारीं माणसं तरुण पिढीसाठी जपून ठेवतात. [ ]

९३ म्हातारी माणस पथ्यपाण्याच्या बाबतीत फार जपून वागतात; म्हणूनच त्यांची प्रकृति वरचेवर बिघडत नाही. [ ]

९४ घरातील भांडणतंटे व कटकटी गुण्यागोविंदानें कशा मिटवाव्यात हें म्हाताऱ्या माणसांनांच चागलं कळतं. [ ]

९५ म्हाताऱ्या माणसाची धर्मविषयक मूल्य पूर्णपणें विकसित झालेली असतात. [ ]

९६ आजकालच्या तरुणाचं वागण म्हाताऱ्या माणसाना थिल्लरपणाच वाटतं. [ ]

९७ तसाच प्रसग आला तर म्हातारी माणससुद्धा आपल्या अगवळणी पडलेल्या जुन्या सवयी सोडून परिस्थितीशी मिळतं घेतात. [ ]

९८ आपल्या समाजाने हाती घेतलेल्या कार्यात म्हातारी माणसं विघ्नासारखी मध्यें अडमडतात. [ ]

९९ म्हातारी माणस उदार अतःकरणाची असतात. [ ]

१०० म्हातारी माणसं कांही ना काही शिल्लक पदरी ठेवतात; त्यामुळें म्हाताऱ्या माणसाच्या खर्चाचा बोजा तरुणावर नसतो [ ]

१०१ आपल्या प्रकृतिव्यतिरिक्त म्हाताऱ्या माणसाना बोलायला दुसरा विषयच नसतो. [ ]

१०२ घरात म्हाताऱ्या माणसांना ठेवून घेऊन त्यांच्याबरोबर दिवस कंठण्यापेक्षा वनवास बरा. [ ]

१०३ आजकालच्या तरुणांचा देवाधर्मावर विश्वास नाही असा म्हाताऱ्या माणसांचा आक्षेप असतो. [ ]

१०४ म्हाताऱ्या माणसांची नीतिमत्ता व तरुण पिढीची नीतिमत्ता यांत विशेष फरक आढळत नाही. [ ]

१०५ म्हातारीं माणसं मोठीं आळशी असतात. ती काम व जबाबदारी टाळायला टपलेली असतात. [ ]

१०६ म्हातारी माणसं फार समंजस असतात, ती तरुणांच्या भानगडींत नसती ढवळाढवळ करीत नाहीत. [ ]

१०७ एखाद्या म्हाताऱ्या माणसाच्या व तरुण माणसाच्या स्वभावांत म्हणण्यासारखा फरक असा दिसतच नाही. [ ]

१०८ महागाई असो कीं दुसरं कांही असो, ज्यानी आपणांसाठीं आयुष्यभर झीज सोसली त्या म्हाताऱ्या माणसांसाठी वाटेल तो खर्च करण्यास तरुणानी तत्पर असलें पाहिजे. [ ]

१०९ म्हातारीं माणसं आपल्या प्रकृतीबद्दल बोलूं लागली की ते एका कानानं ऐकून दुसऱ्या कानान सोडूनदेण्याइतपत अर्थशून्य असत. [ ]

११० घरांत म्हातारी माणसं असलीं कीं कौटुंबिक कटकटींना तोटा नाही. [ ]

१११ म्हातारीं माणसं इतर चारचौघांइतपतच धार्मिक भावनेच्या आहारी गेलेलीं असतात. [ ]

११२ म्हाताऱ्या माणसांना जबाबदारी नसलेलं चैनीचं जीवन तेवढं हवं असतं. [ ]

११३ समाजांत म्हातारीं माणसं नसतीं तर समाजाची खूप प्रगति झाली असती. [ ]

११४ कांहीं म्हातारी माणसं चिरचिऱ्या स्वभावाचीं असतील पण बरीचशीं आनंदी वृत्तीचीही असतात. [ ]

११५ म्हाताऱ्या माणसांना घरांतील तरुणांनी वैयक्तिक खर्चासाठीं म्हणून ठराविक रक्कम नियमितपणें द्यायला हवी. [ ]

११६ म्हाताऱ्या माणसाना इतकी दुखणीं येतात कीं सारखं दुखण्याबद्दल बोलण्याशिवाय त्यांना गत्यंतर नसतं. [ ]

११७ म्हातारी माणसं घरांत असल्यास त्यांच्या सल्ल्याशिवाय तरुणांनी कसलंच काम पत्करूं नये. [ ]

११८ म्हातारी माणसं आपल्या धार्मिकपणाचा देखावा करण्यासाठीं धडपडत असतात. [ ]

११९ म्हातारी माणसं विकृत मनोवृत्तीची असतात. [ ]

११० आजकाल राजकारणांत व समाजकारणांत म्हाताऱ्या माणसांना फाजिल महत्त्व दिलें जातें. [ ]

१२१ म्हातारी माणसं माणूसघाणी असतात. [ ]

१२२ म्हातारीं माणसं आयतोबासारखी जगतात; त्यांना खर्चासाठीं पैसे मुळींच देऊं नयेत. [ ]

१२३ म्हातारी माणसं एरवी कितीही चांगली असलीं तरी त्यांच्या वरचेवर बिघडणाऱ्या प्रकृतीमुळें तीं इतरांना त्रासदायक ठरतात. [ ]

१२४ घरांत म्हातारीं माणसं असलीं तरी महत्त्वाच्या बाबतींत तरुणांनी त्यांचा सल्ला घ्यायलाच पाहिजे असें नाही. [ ]

१२५ म्हाताऱ्या माणसांची धार्मिक वृत्ति सहजस्फूर्त असते. [ ]

१२६ म्हातारी माणसं पक्कीं आंतल्या गांठीचीं असतात. [ ]

१२७ म्हाताऱ्या माणसांच्या सहवासांत प्रत्येकाला बेचैन वाटणं स्वाभाविक आहे. [ ]

१२८ म्हातारी माणस सहनशील असतात, कसल्याही कठीण प्रसगाला ती मुळींच डगमगत नाहींत. [ ]

१२९ तरुणांच्या खर्चाचा भार हलका करण्यासाठीं म्हातारीं माणसं शक्य तों कमी खर्च करतात. [ ]

१२० म्हाताऱ्या माणसांना कुटुंबांत बेताचा मान दिला तरच संसाराची घडी नीट बसते. [ ]

१३१ तसं पाहिल तर म्हाताऱ्या माणसांमध्यें इतर चार चौघांहून निराळे असे कोणतेही दोष नसतात. [ ]

१३२ म्हाताऱ्या माणसाचा सहवास सुखावह असतो. [ ]

१३३ म्हातारी माणसं मानसिक त्रास मुळींच सहन करूं शकत नाहीत. [ ]

१३४ साठवलेला पैसा म्हातारी माणसं प्राणापलीकडे जपून ठेवतात. [ ]

१३५ म्हाताऱ्या माणसाची राहण्याची सोय त्यांच्या कुटुंबापासून दूर अशा स्वतंत्र ठिकाणीं त्यांच्या वयाच्या इतर माणसांसमवेत व्हायला पाहिजे. [ ]

१३६ म्हातारी माणसं तरुणां इतक्या डोळसपणानं वस्तुस्थितीची दखल घेतात. [ ]

१३७ तरुणांच्या कार्यात म्हाताऱ्या माणसांचा आशीर्वाद हमखास लाभदायक ठरतो. [ ]

१३८ मानसिक ताणावर मात कशी करावी हें म्हाताऱ्या माणसांकडून शिकावें. [ ]

१३९ म्हातारीं माणसं खर्चाच्या बाबतींत इतर चारचौघांप्रमाणेंच असतात. ] ]

१४० म्हाताऱ्या माणसांच्या छत्राखालीं कुटुंबाचं स्वास्थ्य टिकून राहतं. [ ]

१४१ म्हातारी माणसं तरुणांइतकींच जागरूक व तडफदार असतात. [ ]

१४२ म्हातारीं माणसं इतक्या कोत्या वृत्तीचीं असतात कीं, तरुणांनीं त्यांच्या आशीर्वादाची आशाच न केलेली बरी. [ ]

१४३ म्हाताऱ्या माणसांना चारचौघांत मिसळायला फार आवडतं. [ ]

१४४ म्हाताऱ्या माणसांचा व तरुणांचा दृष्टिकोन इतका भिन्न असतो कीं, म्हाताऱ्यांची राहण्याची व्यवस्था कुटुंबापासून दूर अशा एखाद्या स्वतंत्र संस्थेतच व्हावी. [ ]

# APPENDIX VI (B)

## English Version of the list of 144 Items along with the Instructions given to the Judges

(For Research Purpose Only)

Name
Male :
Female:

Address :

Education :

Occupation :

Several statements have been given below regarding old persons and their behaviour. While some statements are in favour of the old persons to different degrees others are similarly in disfavour of them to similar degrees. In addition, some statements indicate neutrality neither being favourable nor unfavourable. Please read all the statements very carefully and assess their degree of favourability and unfavourability or neutrality as explained below.

All the statements are required to be classified into eleven piles as A, B, C, D, E, F, G, H, I, J and K. Out of these 11 letters A, B, C, D and E indicate disfavourability in a descending proportion A showing the maximum disfavourability while E showing the minimum

disfavourability. Similarly the letters G, H, I, J and K indicate favourability in an ascending proportion, G showing the minimum favourability while K showing the maximum favourability. The letter F stands in the neutral position, neither showing favour or disfavour. Thus these 11 letters form a scale starting from an extreme unfavourability to an extreme favourability.




All the statements producing disfavour feelings towards the old such as hatred, anger, envy, disrespect, etc. are to be classified regarding their unfavourability in a descending order as A, B, C, D and E.

On the contrary all the statements producing favourable feelings towards the old such as respect, admiration, affection, pride, gratitude, etc. are to be classified regarding their favourability in an ascending order as G, H, I, J and K.

The statements which do not produce any of the above feelings are to be classed as F.

For example, suppose instead of 'Old Persons' following statements on the subject of 'Tea' are given to you for a similar classification -

1. Tea is one of the most essential requirements of human life.
2. Tea is a kind of poison.
3. Tea is a drink without any obvious values or drawbacks.
4. A person feels refreshed by drinking tea.
5. Nutritious elements are conspicuously absent in tea.

Mostly you might classify the above statements as under.

Statement No. 1 - Pile K

Statement No. 2 - Pile A

Statement No. 3 - Pile F

Statement No. 4 - Pile any one of G, H, or I

Statement No. 5 - Pile any one of C, D, or E

While classifying herein the question of your personal likes or dislikes for tea does not arise, because the classification is to be done on the relation of the subject of 'Tea' and the statements concerning it. In this manner you are required to assess the relation between the subject (e.g. Tea) and the statements concerning it (e.g. Statements regarding Tea).

Much of the success of this research work depends on the careful classification carried out by you. Please therefore assess every statement as critically

as possible and put the corresponding letter of the pile in the brackets provided against the statement,

e.g. 1. Tea is one of the most essential requirements of human life ... ... ... (K)

2. Tea is a kind of poison ... ... (A)

1. Old people appear so shabby that one does not even feel like looking at them. ( )

2. A wise person should not enter into discussion with old persons as it is impossible even for the Almighty to convince them. ( )

3. Old people raise great hue and cry even if a slight thing happens against their wishes. ( )

4. Old people feel reluctant to live on the money of the young. ( )

5. Old people can lead a normal life like others as their health is similar to that of a common person. ( )

6. Old people should be respected by all the people in the family. ( )

7. Old people are slaves of the silly religious concepts. ( )

8. The moral values of old people are of high standard. They will never cheat others. ( )

9. Old people are graceful and impressive in appearance. ( )

10. One should not pay much attention to what old people say. Their advice is so worthless as to ignore it immediately after listening. ( )

11. Old people are of quiet and balanced nature. ( )

12. Being lazy to work by themselves old people lay their burden of expenses on the young. ( )

13. Old people are engrossed in thoughts of their health complaints only. ( )

14. The lodging of the old people aught to be arranged in a good manner in the family of their children. ( )

15. Old people are atheistic. ( )

16. Old people keep their word at any cost. ( )

17. Old people behave in a crazy manner. ( )

18. Old people must be duly respected in society. ( )

19. Old people are very selfish. They have unduly high expectations from the young. ( )

20. Howsoever aged the old people be they do not like to lead their lives on the earnings of others. They struggle hard to live on their own. ( )

21. Old people have a bad habit of making a fuss of their ill-health. ( )

22. Old people become a nuisance to other members of the family. ( )

23. Old people are fanatical and devotional. ( )

24. Old people should never be taken into confidence. They cannot keep secrets of others. ( )

25. That old people look ugly is as true as that some look attractive. ( )

26. Old people have become a burden to society. ( )

27. The whims of old people change every moment; one cannot know what they want. ( )

28. Old people are so greedy that hoarding their own money they make the younger generation bear their expenses. ( )

29. There is not much difference in the attitude toward their own health problems between the old people and others. ( )

30. Most of the quarrels and botherations at home arise because of the old people. ( )

31. As most of the time of the old people is spent in meditation and religious services they are not at all a nuisance to others. ( )

32. Old people openly commit treachery. ( )

33. Old people have impressive personality. ( )

34. Had there been no old people in this world there would not have been any want of happiness. ( )

35. Old people are hot-tempered, irritable and bothersome. ( )

36. Old people are like other normal persons in matters of expenses. ( )

37. Old people like very much to caress their own troubles. ( )

38. It becomes a bothersome task for the members of a family to take care of the old. ( )

39. In religious matters old people are as vigilant as the young. ( )

40. Old people are corrupt. ( )

41. Old people are clean and neat. ( )

42. Old people can give best guidance to the society. ( )

43. Old people are suspicious and jealous by nature. ( )

44. With old people at home it is impossible to control domestic expenses. ( )

45. Old people take proper care of their health. ( )

46. With old people at home mental peace of the young in the family gets disturbed. ( )

47. Old people make such a mess of the 'sowalen and owalen' (sacredness leading to untouchability).( )

48. Old people keep themselves aloof from corruption. ( )

49. In general no appreciable difference in the personalities is observed between that of the old and others. ( )

50. Old people are a boon to the society. Their social status is indisputable. ( )

51. Old people have no sympathy for the difficulties of others. ( )

52. Old people expect the young to spend for themselves beyond their means. ( )

53. After hearing the numerous complaints about the health problems of the old one would prefer death to living as an old man. ( )

54. With old people at home the family atmosphere becomes healthy. ( )

55. Old people try to enforce their religious ideologies on the young. ( )

56. Old people do not care for morality. ( )

57. Old people are queer in behaviour and equally strange in appearance. ( )

58. Old people do not contribute a bit to the progress and prosperity of the society. ( )

59. Old people are jolly. ( )

60. Old people are spendthrift. They do not at all feel for squandering away the hard earned money of the young. ( )

61. Old people neglect their health and so their health troubles are augmented. ( )

62. Old people shoulder several responsibilities of the young in the family and so the life of the young in such families is joyful. ( )

63. Although old people are victims to religious sentiments the young are not affected thereby. ( )

64. Old people have a bad habit of carrying tales. ( )

65. Old people are very affectionate and sweet. ( )

66. Old people are bores. Their rambling talks have no end. ( )

67. Old people do not at all like to trouble others. That is why they keep their worries to themselves. ( )

68. Whenever situation arises to spend the money of the young the old people do so cautiously. ( )

69. Old people are fairly healthy though not as much as the young. ( )

70. The young find life unbearable because of the meddling of the old people in all their affairs. ( )

71. Old people try to conceal their snobbishness under the disguise of religiousness. ( )

72. Old people are very particular about returning borrowed things. ( )

73. Both the dress and the living of old people are shabby. ( )

74. It is a formidable task to adjust properly with the old people. ( )

75. Old people are extremely selfless; they are prepared for any sacrifice for the sake of the young. ( )

76. In spite of high sympathy for the old in these days, high costs it is better for the young not to bear the expenses of the old. ( )

77. Old people spend all their time harping on their physical ailments. ( )

78. It is the prime duty of every young person to take care of the old people in the family. ( )

79. Old people can afford to make a fuss of religion only because they make their living at other's cost. ( )

80. Old people hate the moral values of the modern youth. ( )

81. Old people make proper use of cosmetics. ( )

82. Younger generation definitely gets the help and sympathy from the old people. ( )

83. Old people are extremely miserly. ( )

84. The needs of the old people being limited they do not incur much expenditure. ( )

85. Old people spoil their health because of their voracious eating habits. ( )

86. Having of old people at home is a boon to the young. ( )

87. Old people spend so much time in rites and rituals that they hardly get any time to help in other matters. ( )

88. Old people are awefully conceited of their morality. ( )

89. Old people are never able to adjust to the circumstances because of their rigid habits. ( )

90. There being no noteworthy difference between the old people and the young generation one can easily mix with them (old). ( )

91. Old people are so very thoughtful that the young generation should definitely take a lesson from them. ( )

92. Old people preserve their whole life's saving for the young generation. ( )

93. Old people are cautious about their food habits; that is why their health does not frequently get spoiled. ( )

94. Old people alone know how to settle amicably the disputes and botherations at home. ( )

95. The religious values of the old people are fully developed. ( )

96. Old people consider the behaviour of the present youth undignified. ( )

97. In critical situations even the old people adjust to the circumstances leaving aside their ageold habits. ( )

98. Old people become great obstacles in the way of the work undertaken by society. ( )

99. Old people are generous at heart. ( )

100. Old people keep aside some savings of their own. That is why the burden of their expenses is not required to be shouldered by the young. ( )

101. Old people have no topic to discuss other than health. ( )

102. It is better to be an ascetic rather than keeping the old at home and stay with them. ( )

103. Old people charge the young of not having faith in religion and God. ( )

104. There is no marked difference between the morality of the old and the young. ( )

105. Old people are exceedingly idle. They seek every chance to avoid work and responsibility. ( )

106. Old people are very considerate; they do not unnecessarily meddle with the affairs of the young. ( )

107. There is no noteworthy difference between the nature of the old and the young. ( )

108. Whether the days are of high cost or whatever be the other circumstances, the young should ever be ready to bear any expenses for the old people who have struggled throughout their life for the sake of the young. ( )

109. Once the old people start talking about their health, it is so meaningless as to pay no attention to it. ( )

110. If there be old people at home, there is no dearth of family worries. ( )

111. Old people are victims to religious sentiment only as much as the other normal persons. ( )

112. Old people want only the easy life involving no responsibility. ( )

113. Had there been no old people, society would have progressed better. ( )

114. A few old persons may be irritable; but there are many who are jolly. ( )

115. The young people at home should regularly give some amount to the old persons for their personal expenditure. ( )

116. Old people have so many ailments that they cannot help talking about them only. ( )

117. If there are old people at home, the young should not undertake any work without consulting them. ( )

118. Old people struggle hard to make a fuss of their religiousness. ( )

119. Old people are neurotic. ( )

120. In the present days, old people are given undue importance in political and social fields. ( )

121. Old people are unmixing by nature. ( )

122. Old people expect everything ready for them; they should not be given money for their expenses. ( )

123. Ordinarily, howsoever good old people be, still they become troublesome to others because of their constant health complaints. ( )

124. It is not essential to consult the old people in important matters, even if they happen to be at home. ( )

125. The religious sentiment of the old is spontaneous. ( )

126. Old people are very reticent. ( )

127. It is natural for one to feel uneasy in company of the old. ( )

128. Old people are patient; they never fumble in critical situation. ( )

129. In order to lessen the burden of expenses for the young, old people spend as little as possible. ( )

130. Family can run smoothly only when the old people are respected within limits. ( )

131. Old people, generally, have no vices other than those of the normal persons. ( )

132. The company of the old is pleasant. ( )

133. Old people cannot at all stand mental strain. ( )

134. Old people preserve their accumulated wealth at any cost. ( )

135. The lodging of the old people aught to be amongst the people of the same age and at an independent place away from their families. ( )

136. Old people face facts as vigilently as the young. ( )

137. The blessings of the old are always beneficial to the young in their undertakings. ( )

138. One should learn from the old how to overcome mental strain. ( )

139. In matters of expenditure, the old are just like other normal persons. ( )

140. The family peace lasts under the guidance of the old. ( )

141. Old people are as much vigilent and lively as the young. ( )

142. Old people are so narrow-minded that it is better for the young not to expect their blessings. ( )

143. Old people love to mix with others. ( )

144. The views of the old and the young are so different that the lodging arrangement of the old should be made in an institution, away from the family. ( )